**<u>कौ.हि.म.सं.अ. अर्ज क्र. २८/२०२२ मधील नि. ०५ वरील आदेश</u>**

१. अर्जदाराने सदरचा अर्ज महिला घरगुती अत्याचार संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ नुसार स्वत:साठी दरमहा दहा हजार रूपये अंतरिम पोटगी मिळणेसाठी व इतर मागण्याठी दाखल केला आहे.

**<u>थोडक्यात वस्तुस्थिती अशी आहे की,</u>**

२. अर्जदार व जाबदार यांचा विवाह २९/०५/२०१४ रोजी विशाल लॉन, गोंदिया येथे झाला. लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदार क्र.१ बरोबर नांदायला गेली. लग्नामध्ये अर्जदाराला सर्व वस्तु दिल्या होत्या. लग्नानंतर गैरअर्जदार क्र. १ त्याच्यावर ८०,०००/— रूपये ची उधारी आहे त्यामुळे ती फेडण्यासाठी तो अर्जदाराला माहेरून ५०,०००/— आणण्यासाठी बोलत होता व प्रेमाने वागत नव्हता. गैरअर्जदार क्र. २ व ३ अर्जदाराशी घरगुती कारणावरून वाद करत होते. गैरअर्जदार क्र. १ हा कारण नसतांना भांडण तंटा करून अर्जदाराला शिविगाळ करून थापडबफक्यांनी मारहाण करीत होता. अज्रदार फेब्रुवारी २०१५ मध्ये गर्भवती असतांना गैरअर्जदाराने तिची काळजी घेतली नाही. गैरअर्जदार क्र. १ ने दारू पिवून अर्जदाराला रांड वेश्या अशी अश्लिल शब्दात शिविगाळ करून तिच्याकडून घरगुती काम करून घेत होता व गैरअर्जदाराने अर्जदाराच्या पोटावर लाथ मारली त्यामुळे अर्जदाराला गर्भपात झाला. गैरअर्जदार अर्जदाराच्या चरित्रावर संशय घेत होता व घरातुन बाहेर निघण्यास बंदी करीत होता. गैरअर्जदार अर्जदाराला दारू पिवून शिविगाळ मारहाण करीत होता. अर्जदाराच्या गर्भारपणात गैरअर्जदार अर्जदाराची काळजी घेत नव्हते. गैरअर्जदार अर्जदाराच्या वडीलांकडून मोटारसायकलची मागणी करीत होते. गैरअर्जदार हा अर्जदाराला विनाकारण त्रास देत होता व केस ओढून मारहाण करीत होता. गैरअर्जदाराने अर्जदाराला २४.०३. २०२२ रोजी दारू पिवून भांडण करून घराबाहेर काढले तसेच गैरअर्जदाराने पुन्हा २९.०३.२०२३ रोजी जबर मारहाण केली व घराबाहेर काढले. मुलीला अर्जदारापासून हिसकावून घेतले. त्याबाबत अर्जदाराने नागपुर येथील पोलिस स्टेशनमध्ये ०२.०४.२०२२ रोजी तक्रार दिली. गैरअर्जदाराने अर्जदाराला घराबाहेर काढले व नांदविण्यास नकार दिला.

३. अर्जदाराला उत्पनाचे साधन नाही. गैरअर्जदार हा डबे पुरविण्याचा व्यवसाय करतो तसेच त्याचा चिचभवन येथे धाबा आहे त्यापासून त्याला १,००,०००/— रूपये उत्पन्न मिळतो. त्यामुळे अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**<u>गैरअर्जदाराचे म्हणणे :</u>**

४. गैरअर्जदारा तर्फे नि.क्र. १० कडे मुळ अर्जाला लेखी म्हणणे दिलेले आहे व नि.क्र. ११ कडे अंतरीम पोटगीच्या अर्जाला म्हणणे दिलेले आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराचे अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. गैरअर्जदार यांनी असे कथन केले की, अर्जदार बेजबाबदार आहे व त्यांच्यामध्ये मोकळेपणाचा फरक आहे. अर्जदार क्षुल्लक कारणावरून भांडण करीत होती. अर्जदाराला संयुक्तीक कुटुंबात असतांना स्वतंत्र जगायचे आहे. अर्जदार संयुक्तीक कुटंबात जुळून घेत नाही व सर्व सदस्यावर खोटे आरोप लावत आहे व ते मुळ वादाचे कारण आहे. गैरअर्जदार मोठा मुलगा आहे व त्याच्यावर संपुर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. अर्जदाराची अशी ईच्छा आहे गैरअर्जदाराने त्याच्या आईवडीलांपासून एकटे रहावे व अर्जदाराची काळजी घ्यावी. अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ ला त्याच्यासोबत राहण्यास तयार आहे जर तो त्याच्या पालकांना सोडून तिच्यासोबत निघून संसार करेल असा प्रस्ताव दिला. गैरअर्जदाराने सदरचा प्रस्ताव नाकारला त्यामुळे अर्जदाराने सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे.

५. गैरअर्जदार हा मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे. त्याला दरमहा २२,०००/— पेक्षा जास्त मिळत नाही. अर्जदाराने गैरअर्जदाराचे १,००,०००/— रूपये उत्पन्न असल्याबाबत खोटा दावा केलेला आहे व चुकीची माहिती दिलेली आहे. गैरअर्जदारावर त्याच्या आई वडीलांची जबाबदारी आहे तसेच घरभाडे मुलीचे शिक्षण इन्सुरन्स मासिक हप्ता हे २२,०००/— रूपयांच्या उत्पन्नातुन भागवावे लागते. त्यामुळे गैरअर्जदाराला मागणी प्रमाणे पोटगी देता येत नाही. अर्जदार स्वत : त्याग करून निघून गेलेली आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा.

६. अर्जदारातर्फे वकील श्री. शेंडे यांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदाराचे वकील पुकारले असता गैरहजर. गैरअर्जदारातर्फे युक्तीवाद करण्यात आला नाही.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे गैरअर्जदाराने तिच्या विरूध्द घ ारगुती हिंसाचार केला काय ही बाब प्रथमदर्शनी सिध्द करते का ? | होय. |
| २. | अर्जदार हे मागणीप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | होय. दरमहा रू. ३०००/—. |
| ३. | कोणता आदेश ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

७. अर्जदाराने अर्जाचे पृष्टयर्थ तिचे मालमत्तेचे शपथपत्र, अर्जदाराला पोलिसांनी दिलेले सुचनापत्र, भरोसा सेल नागपुर यांचे कडील अर्ज दाखल केलेले आहे. गैरअर्जदाराने त्याचे मालमत्तेबाबतचे शपथपत्र दाखल केलेले आहे.

८. अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह झाल्याचे व विवाहातुन एक मुलगी झाल्याचे मान्य केलेले आहे.

**<u>मुद्दा क्र. १ व २ साठी</u>**

९. अर्जदाराच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की गैरअर्जदार हा अर्जदारास दारु पिउन मारहान करीत होता. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या पोटावर लाथ मारली त्यामुळे तिचा गर्भपात झाला गैरअर्जदार अर्जदाराकडे पैशाची मागणी करीत होता तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराला दिनांक २९.०३.२०२२ रोजी घरातुन हाकलून दिले. त्यामुळे अर्जदाराने तिच्याविरूदध जाबदाराने घरगुती हिंसाचार केला ही बाब सिदध केली आहे. त्यामुळे अर्जदारास पोटगी मिळण्याचा अधिकार आहे. घरगुती हिंसाचार प्रथमदर्शी दाखविण्यासाठी अर्जदाराने पोलिसांनी दिलेले सुचनापत्र व भरोसा सेल यांच्याकडे दिलेला अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जामध्ये गैरअर्जदार यांनी अर्जदाराला दारू पिवून शिविगाळ करून तिच्यावर संशय घेतात

असे कथन केलेले आहे. गैरअर्जदाराने युक्तीवाद केलेला नाही परंतु गैरअर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदाराला एकत्र कुटुंबात राहायचे नाही व अर्जदाराने स्वत : त्याग केलेला आहे.

१०. घरगुती हिंसाचार कायदयाप्रमाणे कलम २३ च्या अर्जाचा विचार करता अर्जदाराने प्रथमदर्शनी तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला ही बाब दाखविणे महत्वाचे आहे. ही बाब दाखविण्यासाठी अर्जदाराने तिला पोलिस स्टेशनकडून मिळालेले सुचनापत्र तसेच भरोसा सेल यांच्याकडे अर्जदाराने दिलेला अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराने शपथेवर असे कथन केलेले आहे की, गैरअर्जदार अर्जदाराला दारू पिवून मारहाण करीत होता अर्जदाराकडे पैशाची मागणी करीत होता गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराच्या पोटावर लाथ मारली त्यामुळे तिचा गर्भपात झाला व गैरअर्जदाराने अर्जदाराला दिनांक २९.०३.२०२२ रोजी घरातुन हाकलून दिले.

११. घरगुती हिंसाचार कायदयामध्ये घरगुती हिंसाचार या शब्दाची व्याख्या दिलेली आहे व सदर व्याख्यानुसार स्त्रीचे पालनपोषण न करणे, स्त्रीला मारहान करणे, तिला त्रास देणे हे हिंसाचार या व्याख्येत बसते. सदर केस पाहता गैरअर्जदाराने अर्जदारास पालनपोषणासाठी काही रक्कम दिली असे कुठेही रेकॉर्डवरून दिसुन येत नाही. तसेच गैरअर्जदाराची अर्जदारास सांभाळण्याची जबाबदारी असताना गैरअर्जदाराने ती जबाबदारी पार पडलेली नाही. तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराला मारहान केल्याचे व तिला हाकलुन दिल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते.

१२. गैरअर्जदाराने अर्जदार हि स्वत:हून राहत असल्याचे कथन केले आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह २९/०५/२०१४ रोजी झाला व सदर लग्नातून एक मुलगी झालेली आहे. कोणतीही स्त्री मुलीच्या जन्मानंतर विनाकारण आपल्या पतीचा त्याग करणार नाही. सदर बाबीवरून गैरअर्जदार यांनी अर्जदाराविरूदध घरगुती हिंसाचार केला ही बाब स्पष्ट होते.

१३. अर्जदाराने अर्जात असे कथन केले आहे की, गैरअर्जदार याचा डबे पुरविण्याचा व्यवसाय आहे तसेच त्याचा धाबा आहे व त्यापासून त्याला १,००,०००/— रूपये मिळतात. अर्जदाराने सदरची बाब सिध्द करण्यासाठी कोणताही प्रथम दर्शनी पुरावा दिलेला नाही. अर्जदाराने सावजी रेस्टारेंट असा लिहिलेला एक कागद दाखल केलेला आहे परंतु त्या कागदावरून गैरअर्जदार याचा धाबा आहे हे दिसुन येत नाही. गैरअर्जदार यांनी स्वत:चे मालमत्तेचे शपथपत्र दाखल केलेले आहे. तसेच गैरअर्जदार याने त्याच्या म्हणण्यामध्ये त्याला महिन्याल्या २२,०००/— रूपये उत्पन्न मिळते हे मान्य केलेले आहे. गैरअर्जदाराने त्याच्या शपथपत्रामध्ये त्याला २२,०००/— रूपये उत्पन्न मिळते व त्याला २३,०००/— रूपये खर्च येतो असे कथन केलेले आहे. अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी आहे. तिला सांभाळण्याची जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. अर्जदाराने तिच्याविरूध्द घरगुती हिंसाचार झाला हे प्रथमदर्शनी दाखविणे आहे. गैरअर्जदाराचे उत्पन्न पाहता गैरअर्जदाराने अर्जदाराला प्रतिमाह ३,०००/— रूपये इतकी पोटगी अर्ज दाखल तारखे पासुन दयावे. असे आदेशीत करणे योग्य होईल. म्हणुन मी मुद्‌दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र. ३ साठी:</u>**

१४. मुददा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे. त्यामुळे अर्ज अंशत: मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुददा क्र. ३ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. गैरअर्जदार याने अर्जदारास दरमहा रू. ३०००/— (रूपये तिन हजार फक्त) इतकी पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन म्हणजे दिनांक २१/१०/२०२२ पासुन दयावी.

२. या अर्जाचा खर्च वादाच्या अनुषंगाने आकारण्यात येईल.

दिनांक : १०/०८/२०२३

( डी. आर. बडवे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तिरोडा